# बृहन्मुंबई महानगरपालिका
## वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालय

### जाहिरात

महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी क्र.एमजीसी/एफ/५९४८ दि.२७.०३.२०२५ नुसार वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालय खात्याच्या आस्थापनेवरील, गट 'ब' मधील सातव्या वेतन आयोगानुसार (M-28) रुपये ५२,००० – १६५,१००/-अधिक अनुज्ञेय भत्ते (सहाव्या वेतन आयोगानुसार रुपये ९३००-३४८००+ श्रेणीवेतन रु.५४००/-) या वेतनश्रेणीतील पशुवैद्यकीय अधिकारी संवर्गाची रिक्त असलेली २ (दोन) पदे सरळसेवेने भरावयाची आहेत. सदर पदासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर प्रस्तुत जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत असून, त्यासाठी **उमेदवारांनी संचालक (प्राणिसंग्रहालय) यांचे कार्यालय, वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालय, दुसरा मजला, पेंग्वीन इमारत, संत सावता मार्ग, भायखळा (पूर्व) मुंबई – ४०० ०२७ येथे व्यक्तिशः/रजिस्टर्ड/स्पीड पोस्टाने त्यांचे अर्ज दि.२५.०४.२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० पर्यंत)** पाठवावेत.

उमेदवारांनी नित्य वापरात असलेला वैध (valid) ई-मेल आयडी अर्जात नमूद करणे आवश्यक आहे. संपूर्ण भरती प्रक्रीयेच्या पूर्ण कालावधीमध्ये सदर ई-मेल आयडी वैध राहणे आवश्यक आहे.

सरळसेवेने भरावयाच्या पशुवैद्यकीय अधिकारी संवर्गातील पदांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.--

| | | |
|---|---|---|
| पदाचे नाव | - | पशुवैद्यकीय अधिकारी |
| वेतन श्रेणी (सुधारित) | - | स्तर एम-२८ (रुपये ५२००० - १६५१००/-अधिक अनुज्ञेय भत्ते) |
| रिक्त पदे | - | २ (दोन) |
| गट | - | 'ब' |

१) सरळसेवा पद्धतीने पशुवैद्यकीय अधिकारी संवर्गाची भरावयाची रिक्त पदे

**उपलब्ध रिक्त पदांचा तसेच सामाजिक व समांतर आरक्षण तपशील खालील प्रमाणे आहे.—**

**(अ) सामाजिक आरक्षणांतर्गत भरावयाची पदे**

| अ क्र | तपशील | अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ईडब्ल्यूएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एकूण भरावयाची पदे | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | १ | २ |

**(ब) समांतर आरक्षणांतर्गत भरावयाची पदे**

| समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | साशैमा प्रवर्ग | आदुघ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ |
| महिला३० % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| खेळाडू ५ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| अनाथ १ % | सदर संवर्गातील रिक्त पदांवर अनाथांकरिता पद आरक्षित होत नाही. | | | | | | | | | | | |
| एकूण | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ |
| दिव्यांग ४ % | ०७ पेक्षा कमी पदे असल्यामुळे दिव्यांगांकरिता पद आरक्षित होत नाही. | | | | | | | | | | | |

(क)**दिव्यांग आरक्षण –**

प्राणिसंग्रहालय खात्याच्या आस्थापनेवर गट 'ब' मध्ये सरळसेवा/निवडीने करावयाचा एकमेव संवर्ग असून पशुवैद्यकीय अधिकारी संवर्गाच्या दोन (२) पदांपैकी दिव्यांगासाठी एकही पद आरक्षित होत नाही. तथापि, दिव्यांग उमेदवार खालील नमूद दिव्यांग पद सुनिश्चितीनुसार शारिरीक क्षमता, दिव्यांगाचा प्रकार व कामाचे स्वरुप विचारात घेऊन ते ज्या प्रवर्गात मोडत असतील त्या प्रवर्गातून अर्ज करु शकतील. गुणवत्तेवर पात्र ठरलेल्या दिव्यांग उमेदवारास त्या प्रवर्गातील इतर सर्वसाधारण उमेदवारांप्रमाणे सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

**दिव्यांगाकरिता पदसुनिश्चिती –**

| पदनाम | शारिरीक पात्रता | निःसमर्थ (दिव्यांग) प्रवर्ग | सदर पदाची जबाबदारी व कर्तव्ये | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| पशुवैद्यकीय अधिकारी | S-Sitting- (बसणे)<br>ST-Standing (उभे रहाणे)<br>BN-Bending (वाकणे)<br>RW-Reading & writing (लिहीणे व वाचणे)<br>SE-Seeing (पाहणे)<br>H-Hearing (ऐकणे)<br>MF-Manipulation by Fingers (बोटांची हालचाल करणे) | **a)** D- Deaf (कर्णबधीर)<br>HH- Heard of Hearing (ऐकू येण्यातील दुर्बलता)<br><br>**b)** OA- One arm (एक हात)<br>BA-Both arm (दोन्ही हात)<br>OL- One Leg (एक पाय)<br>DW- Dwarfism (शारिरीक वाढ खुंटणे)<br>AAV – Acid attack Victims (आम्ल हल्लाग्रस्त)<br><br>**c)** SLD – Specific Learning Disability (विशिष्ट शिक्षण अक्षमता)<br>MI – Mental Illness (मानसिक आजार)<br><br>**d)** MD involving (a) to (c) above<br>उपरोक्त (अ) ते (क) मधील एकाधिक अपंगत्वासह | महानगर पालिकेच्या अखत्यारितील प्राणिसंग्रहालय खात्यातील पशुवैद्यकीय विषयक कामकाज आणि आवश्यक उपाययोजना करणे.<br>कर्तव्ये --<br>◦ वन्यप्राणी/पक्षी हाताळणी व दैनंदिन उपचार, देखभाल, नियमित आरोग्य तपासणी करणे.<br>◦ नियमितपणे वन्यप्राण्यांच्या विविध तपासण्या (रक्त/लघवी/विष्ठा), प्राण्यांचे लसीकरण , औषधोपचार करणे.<br>◦ मृत प्राण्यांचे शवविच्छेदन करुन नंतर लॅबमध्ये सॅपल पाठवून निकाल तपासणे.<br>◦ प्राणी प्रदर्शनीमध्ये एनरिचमेंट करणे, प्राणी प्रदर्शनीच्या दुरुस्तीकरिता आवश्यक उपाययोजना व काळजी घेणे.<br>◦ वन्यप्राण्यांच्या औषधांचा साठा ठेवणे, औषधांची देयके, नोंदवही, सूची ठेवणे, नियमित अहवाल बनविणे.<br>◦ वन्यप्राण्यांची यादी (त्रैमासिक, वार्षिक) तयार करुन राज्य/केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणास पाठविणे.<br>◦ वन्यप्राणी जन्म-मृत्यू नोंद, प्राणी आदान-प्रदान याविषयी कार्यवाही करणे, नोंदी ठेवणे.<br>◦ देश-विदेशातील प्राणिसंग्रहालयांशी पत्रव्यवहार करणे.<br>◦ राज्य/केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणे, वन्यजीव संस्था, इ. सोबत बैठका, दौरे करुन अहवाल देणे. | उमेदवारास योग्य ती सॉफ्टवेअर साधने (संगणक, सी.सी.टी. व्ही., एक्स-रे / सोनोग्राफी मशीन, इ.) यांची हाताळणी आणि वैद्यकीय उपकरणे यांचा कुशलतेने वापर करता येणे आवश्यक आहे. संगणक ज्ञान, इंटरनेट, सॉफ्टवेअर ज्ञान आवश्यक.<br><br>प्राणिसंग्रहालयामध्ये उष्ण, अतीशीत आणि दमट हवामानामध्ये काम केले जाते. तसेच पावसाळयात पाण्यात देखील काम करावे लागते. पशुवैद्यक कार्ये मुख्यत्वे कार्यालयाबाहेर फिल्डवर राहून एकट्याने करावयाची आहेत. प्राणिसंग्रहालयातील काम प्राणीहिताचे, आरोग्य विषयक आणि जोखिमीचे असल्याने कर्मचा-याच्या पाहण्याची, ऐकण्याची क्षमता, हातापायाचे चलन-वलन आणि त्याचे वापराचे कौशल्य पर्याप्त असणे आवश्यक आहे.<br><br>यास्तव शासन निर्णय क्र. दिव्यांग २०२१/ प्र.क्र.३३/न.वि.-२८ दि.१६-०४-२०२१ व क्र. एमबीसी/६०४ दिनांक २९-०४-२०२१ अन्वये प्रसारित केलेल्या शासन निर्णयातील परिशिष्ट अ मधील अनु.क्र.५१ वरील पशुवैद्यकीय अधिकारी या संवर्गाकरिताच्या दिव्यांग सुनिश्चितीनुसार खात्याच्या आस्थापनेवरील पशुवैद्यकीय अधिकारी या संवर्गाकरिता स्वीकृत करण्याकरिता प्रस्ताविण्यात येत आहे. |

परिपत्रक क्र.एमबीसी/३७९६ दि.१०-०४-२०२४ सोबतचा शासन परिपत्रक क्र.दिव्यांग-२०१९/प्र.क्र.२५१/ दि.क.२ दिनांक २९-०२-२०२४ मधील निर्देशानुसार Locomotor Disability या अस्थिव्यंग प्रकारामध्ये Spinal Deformity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological / limb dysfunction हा स्वतंत्र उपप्रकाराचा समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्यानुसार शासन सेवेतील जी पदे अस्थिव्यंग (Locomotor Disability) प्रवर्गांतर्गत OA, OL, BL, OAL, BLOA व BLA या दिव्यांग प्रवर्गासाठी सुनिश्चित करण्यात आलेली आहेत. अशी सर्व पदे Spinal Deformity (SD) and Spinal Injury (SI) without any associcated neurological / limb dysfunction या स्वतंत्र उपप्रकारांसाठीसुद्धा सुनिश्चित राहतील.

टिप –

१. भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.
२. रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत तसेच सामाजिक / समांतर आरक्षण बदलण्याचे अधिकार किंवा भरती प्रक्रीया कोणत्याही टप्प्यावर अंशत: / पूर्णत: रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.
३. सामाजिक व अन्य समांतर आरक्षणाची पदे भरण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केली जाईल.
४. दिव्यांग उमेदवारांनी संबंधित पदांची कर्तव्ये, जबाबदारी, अपेक्षित शारिरीक क्षमता/पात्रता व दिव्यांग प्रकार याबाबतची अपेक्षा दर्शविणारी माहिती संदर्भित करून त्याप्रमाणे अर्ज करणे आवश्यक आहे. दिव्यांग प्रवर्गातील उमेदवारांनी सक्षम प्राधिका-याचे दिव्यांग प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. ४० टक्के पेक्षा कमी दिव्यांगत्व असलेल्या उमेदवाराने दिव्यांग आरक्षणांतर्गत नियुक्तीसाठी अर्ज केल्यास अशा उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल.
५. दिव्यांग पदसुनिश्चितीनुसार विहित पात्रता धारण करणारे दिव्यांग उमेदवार त्या त्या जात प्रवर्गात तसेच सर्वसाधारण गटातून अर्ज करु शकतात व ते गुणवत्तेनुसार सर्वसाधारण गटातून निवडीस पात्र ठरु शकतात व त्यावेळेस त्यांना सर्वसाधारण उमेदवारांप्रमाणे सेवा शर्ती लागू राहतील.
६. अराखीव (खुला) उमेदवारांकरिता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषांसंदर्भातील अटींची पूर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदांवरील शिफारशीकरिता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.
७. एका उमेदवारास एका पदासाठी एकच अर्ज सादर करता येईल.
८. मागास प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गामध्ये भरतीकरिता अर्ज करण्याची मुभा राहील. परंतु, एकाच उमेदवाराचे एकापेक्षा जास्त अर्ज विचारात घेता येणार नाहीत.
९. परिपत्रक क्र.एमबीसी/६६४ दि.२१-०७-२०२३ सोबत संलग्नित शासन निर्णय क्र.तृतीय-२०२२/प्र.क्र.३७९ /सामासु दि.०३-०३-२०२३ अन्वये 'राज्यातील तृतीयपंथी या समाज घटकांची सर्वांगीण उन्नती व्हावी व त्यांना समाजाच्या विकास प्रवाहात आणण्यासाठी तसेच तृतीयपंथीयांना भेदभावरहित वागणूक देण्यासाठी भरती प्रक्रीयेमध्ये अर्ज / आवेदनपत्रावर लिंग पर्याय म्हणून 'पुरुष', 'स्त्री' या घटकाबरोबर 'तृतीयपंथी' हा पर्याय उपलब्ध करुन देण्यात येत आहे'.

**२) सामाजिक व समांतर आरक्षण --**

२.१ महिलांसाठी ३० % प्रमाणे आरक्षित पदे, महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२ दि.२५.०५.२००१ अन्वयेच्या शासन निर्देशानुसार भरण्यात येतील. तथापि, एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास, सदर पदे त्या प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

२.२ खेळांडूसाठी ५ % प्रमाणे आरक्षित पदे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एमपीएम विभागाचे परिपत्रक क्र. एमपीएम/२/१२६० दि.३१.०१.२०१७ सोबतचा महाराष्ट्र शासन, शालेय व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. राक्रीधो -

२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि.०१.०७.२०१६ तसेच समक्रमांकाचे शासन शुद्धीपत्रक दि.१८.०८.२०१६ आणि शासन निर्णय क्र.संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२ दि.३०.०६.२०२२ मधील दिलेल्या निर्देशांनुसार शासन मान्य क्रीडा प्रकारातील अत्युच्च गुणवत्ताधारक स्त्री व पुरुष खेळाडूंसाठी ५ % समांतर आरक्षण ठेवण्यात येईल.

खेळाडू उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वीच विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खेळाडू उमेदवाराने, महाराष्ट्र शासन, शालेय व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. राक्रीधो - २००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि.०१.०७.२०१६ अन्वये सुधारित तरतुदीनुसार विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे उमेदवाराने कागदपत्रे पडताळणीच्यावेळी विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्रविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरिता, संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे. खेळाडू आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या उमेदवारांच्या राज्य/राष्ट्रीय स्पर्धेच्या प्रमाणपत्राबाबत शंका उद्‌भवल्यास आयुक्त/संचालक क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्याकडून विचारणा करण्यात येईल. (शंका उद्‌भवल्याप्रकरणी विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडील प्रमाणपत्र पडताळणीनंतर नियुक्तीची कार्यवाही करण्यात येईल.)

२.३ अनाथांकरिता १ % प्रमाणे आरक्षित पदे, महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३ दि.०६.०४.२०२३ सम क्रमांकाचे शासन पूरक पत्र दि.१०.०५.२०२३ मधील निर्देशानुसार भरण्यात येतील. प्रस्तुत पदासाठी अर्ज करताना अनाथ आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांनी सदर शासन निर्णय व शासन पूरक पत्रात विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार, संस्थात्मक प्रवर्गातील तसेच संस्थाबाहय प्रवर्गातील अनाथांसाठी प्रमाणपत्र निर्गमित करावयाच्या कार्यपद्धतीचा अवलंब करुन, सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

अनाथ आरक्षणाच्या माध्यमातून अनाथांच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाही तर ती पदे अनाथांच्या दुस-या प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

तसेच अनाथ व्यक्तींचे आरक्षण यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या आदेशानुसार राहील. अनाथांसाठी आरक्षित पदांवर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश, उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

२.४ दिव्यांग आरक्षण ४ % प्रमाणे आरक्षित पदे, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ दि.२९.०५.२०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणा-या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असलेली. दिव्यांग आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणा-या उमेदवारांनी किमान ४० % दिव्यांगत्व असल्याबाबतचे शासकीय सक्षम प्राधिका-यांनी दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

३) **<u>पशुवैद्यकीय अधिकारी पदाची विहित अर्हता</u>** --

1. उमेदवार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदर नसल्यास उमेदवाराचे वय ३८ वर्षे पेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांसाठी सदर वयोमर्यादा ४३ वर्षे
2. उमेदवार वैधानिक विद्यापीठाचा बी.व्ही.एस.सी. ॲण्ड ए.एच. (पशुवैद्यकीय विज्ञान)(Bachelor of Veterinary Science and Animal Husbandry) पदवीधारक असावा.
   एम.व्ही.एस.सी. (पशुवैद्यकीय विज्ञान) (Masters in Veterinary Science) ही पदव्युत्तर पदवी धारण केलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
3. केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली मान्यताप्राप्त प्राणिसंग्रहालयातील प्रत्यक्ष कामाचा दोन (२) वर्षापेक्षा कमी नाही इतका अनुभव असावा.

4. मराठी भाषेसंबंधी - उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च स्तर किंवा निम्न स्तर) घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
5. संगणक ज्ञानाबाबत - उमेदवार डी.ओ.इ.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा ओ स्तर किंवा ए स्तर किंवा बी स्तर किंवा सी स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहित केलेली एम.एस.सी.आय.टी. ची परीक्षा नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षांच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

४) **वयोमर्यादा –**

अ) अराखीव (खुला) प्रवर्गातील उमेदवारांसाठी - किमान १८ वर्षे व कमाल ३८ वर्षे
ब) मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी - किमान १८ वर्षे व कमाल ४३ वर्षे

| अनु.क्र. | प्रवर्ग / आरक्षण | आवश्यक वयोमर्यादा |
|---|---|---|
| (१) | अराखीव (खुला) प्रवर्गातील उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२ दिनांक २५-०४-२०१६ मधील तरतुदीनुसार किमान १८ वर्षांपेक्षा कमी व कमाल ३८ वर्षांपेक्षा जास्त नसावे. |
| (२) | मागासवर्गीय उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२ दिनांक २५-०४-२०१६ मधील तरतुदीनुसार किमान १८ वर्षांपेक्षा कमी व कमाल ४३ वर्षांपेक्षा जास्त नसावे. |

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या कर्मचा-यांसाठी वयोमर्यादेची अट नाही. तथापि, त्यांनी अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीचे खाते प्रमुखांचे 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर करणे अनिवार्य राहील.

५) **निवडीचे निकष व निवडीची कार्यपद्धती** ––
पशुवैद्यकीय अधिकारी पदांच्या सेवाप्रवेश नियमानुसार विहित केलेल्या अर्हता विचारात घेऊन खालीलप्रमाणे निवडीचे निकष व निवडीची कार्यपद्धती प्रस्ताविण्यात येत आहे.

अ) निवडीचे निकष --

| अनु | तपशील | गुण |
|---|---|---|
| अ) | **शैक्षणिक अर्हता (एकूण ५० गुण)** | |
| १) | वैधानिक विद्यापीठाचा बी.व्हि.एस.सी.ॲण्ड ए.एच.(Bachelor of Veterinary Science and Animal Husbandry) पदवीधारक (३५% ते ४५%) | ०५ |
| २) | बी.व्हि.एस.सी.ॲण्ड ए.एच.--द्वितीय श्रेणीपदवीधारक(Bachelor of Veterinary Science and Animal Husbandry with Second Class)(४६% ते ५०% ) | १० |
| ३) | बी.व्हि.एस.सी.ॲण्ड ए.एच.--द्वितीय श्रेणीपदवीधारक(Bachelor of Veterinary Science and Animal Husbandry with Second Class)(५१% ते ६०% ) | १५ |
| ४) | बी.व्हि.एस.सी.ॲण्ड ए.एच. --प्रथम श्रेणी पदवीधारक(Bachelor of Veterinary Science and Animal Husbandry with First Class)(६१% ते ७४%) | २० |
| ५) | बी.व्हि.एस.सी.ॲण्ड ए.एच. --विशेष प्राविण्य (Bachelor of Veterinary Science and Animal Husbandry with Distinction) (७५% व अधिक) | ३० |
| ६) | वैधानिक विद्यापीठाचा एम.व्हि.एस.सी. पदवीधारक (Masters in Veterinary Science) किंवा बी.व्हि.एस.सी.ॲण्ड ए.एच. या पदवीसह एम.एस.सी. (वन्यजीव विज्ञान) (Masters in Wildlife Science) पदवीधारक यांना प्राधान्यक्रम | ५० |
| | | |

| | | |
|---|---|---|
| ब) | **<u>अनुभव</u> (एकूण ५० गुण)** | |
| | केंद्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त प्राणिसंग्रहालये/अभयारण्ये/राष्ट्रीय उद्याने येथील पशुवैद्यकीय कामाचा प्रत्यक्ष अनुभव (जाहिरातीतील अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत) | |
| १) | ०२ वर्षापेक्षा अधिक ते ०३ वर्षापर्यंतच्या अनुभवासाठी | २० |
| २) | ०३ वर्षापेक्षा अधिक ते ०५ वर्षापर्यंतच्या अनुभवासाठी | ३० |
| ३) | ०५ वर्षापेक्षा अधिक अनुभवासाठी | ५० |
| | | |

- उमेदवारांस निवडीसाठी पात्र होण्यास निवडीच्या निकषातील 'अ' आणि 'ब' येथे नमूद तपशीलातील एकूण १०० गुणांपैकी किमान ५० गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.
- उपरोक्त निवडीच्या निकषानुसार प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे पात्र ठरलेल्या उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची सामाईक गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.
- निवडीसाठी उमेदवारांची मुलाखत / मौखिक परीक्षा घेण्यात येणार नाही.

पशुवैद्यकीय अधिकारी पदांच्या सेवाप्रवेश नियमानुसार, विहित केलेली अर्हता व अटी-शर्तीच्या पूर्तता करणा-या उमेदवारांच्या प्राप्त झालेल्या अर्जानुसार, निवडीच्या निकषातील नमूद गुणांच्या आधारे, सामाईक गुणवत्ता यादीच्या आधारे अंतिम निवडयादी तयार करण्यात येईल. तथापि, सामाईक गुणवत्ता यादीतील दोन किंवा अधिक उमेदवारांचे गुण समान असल्यास पुढीलप्रमाणे निकष प्रस्ताविण्यात येत आहेत. --

अ) पदवी परीक्षेत प्राप्त केलेली एकूण गुणांची टक्केवारी.
ब) उपरोक्त 'अ' प्रमाणे समान असल्यास, पदवी परीक्षा उत्तीर्ण केल्याचा दिनांक
क) उपरोक्त 'अ' व 'ब' प्रमाणे समान असल्यास, पदव्युत्तर पदवी परीक्षेतील गुणांची टक्केवारी
ड) उपरोक्त 'अ''ब' व 'क' प्रमाणे समान असल्यास, पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण केल्याचा दिनांक
इ) उपरोक्त 'अ''ब''क' व 'ड' प्रमाणे समान असल्यास, प्रत्यक्ष कामाच्या अनुभवाचा कालावधी.
ई) उपरोक्त 'अ''ब''क''ड' व 'इ' प्रमाणे समान असल्यास, वयाने ज्येष्ठ असलेल्यांच्या क्रमानुसार.
उ) वरील निकष लागूनही उमेदवारांची गुणवत्ताक्रम समान येत असल्यास, अशा उमेदवारांचा क्रम त्यांच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार निश्चित करण्यात येईल.

वरील निकषानुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास निवडीचे निकष शिथिल करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना राहतील.

ब) <u>निवडीची कार्यपध्दती</u> --

पशुवैद्यकीय अधिकारी पदांच्या सेवाप्रवेश नियमानुसार, विहित केलेली अर्हता व अटी-शर्तीच्या पूर्तता करणा-या उमेदवारांमधून जाहिरतीव्दारे सरळसेवेने खाते स्तरावर अर्ज मागवून, निवडीच्या निकषात नमूद गुणांच्या आधारे भरती प्रक्रिया राबवून पशुवैद्यकीय अधिकारी संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी पुढील प्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात येईल.

- इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यासाठी अर्जाचा नमुना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिला आहे. तसेच अर्ज करतेवेळी उमेदवाराला काही अडचणी असल्यास त्याचे निरसन वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालय खात्यामार्फत केले जाईल. उमेदवाराने अर्जात वैध ई-मेल, भ्रमणध्वनी स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक राहील.
- निवड झलेल्या पात्र उमेदवारांची अर्हतेतील शैक्षणिक प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रांच्या मूळ प्रती तसेच त्यांच्या छायांकित प्रतींची प्रत्यक्ष तपासणी वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालय खात्यामार्फत करण्यात येईल. पडताळणी दरम्यान, उमेवारांकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न झाल्यास, त्याची उमेदवारी रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील.
- परिपत्रक क्र.एमपीएम/२/३२१३ दि.२२.०२.२००८ सोबतचा शासन निर्णय क्र.संकीर्ण २००७/पडताळणी/वि-२६ दि.२१-११-२००७ तसेच क्र.एमपीएम/२/१९९८ दि.२५.०५.२०१७ व क्र.एमपीएम/२/३६५७ दि.०९.०१.२०१८ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार निवड झालेल्या उमेदवारांच्या बाबतीत संबंधित पोलिस स्टेशनकडून उमेदवाराचे चारित्र्य व पूर्व चारित्र्य प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतर नियुक्ती करण्यात येईल. तथापि,

उमेदवाराची नियुक्ती केल्यानंतर उमेदवाराकडून प्राप्त झालेल्या चारित्र्य व पूर्व चारित्र्य प्रमाणपत्रातील दिनांकापासून ते सदर उमेदवारास प्रत्यक्षात नियुक्ती देण्याच्या दिनांकाच्या कालावधीत उमेदवाराविरुद्ध कोणत्याही प्रकारचा गुन्हा आढळून आल्यास, सदर उमेदवाराचे नियुक्तीपत्र रद्दबातल करुन, भारतीय दंडसंहितेनुसार फौजदारी कारवाई करण्यात येईल. तसेच शासन सेवेस कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल.

**सर्वसाधारण अटी** –

६.१ सदर भरती प्रक्रियेत अंतिम निर्णय घेण्याचे व प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव सदर सरळसेवा भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील.

६.२ विहित आरक्षणानुसार रिक्त पदांच्या उपलब्धतेप्रमाणे नेमणूका करण्यात येतील. उमेदवार विहित अर्हता व अटी-शर्ती पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. उमेदवाराची नेमणूक झाली असल्यास, सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

६.३ अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचा-याला भरतीकरिता अर्ज करावयाचा असेल तर त्याने/तिने, त्याच्या/तिच्या खातेप्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र, अर्ज सादर करण्यापूर्वी घेणे आवश्यक आहे. सदर ना-हरकत प्रमाणपत्र/चौकशी प्रमाणपत्र प्रत्यक्ष नियुक्तीपूर्वी, नियुक्ती प्राधिका-यांना सादर करणे आवश्यक राहील.

६.४ उमेदवार प्रस्तृत भरतीप्रक्रियेतील पदासाठी अर्ज करतेवेळी इतरत्र नोकरी करीत असल्यास, पूर्वीच्या नियुक्त्यांचे 'ना-हरकत प्रमाणपत्र' अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

६.५ उमेदवाराचा ई-मेल आयडी, दूरध्वनी, भ्रमणध्वनी क्रमांक आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसहित) अर्जावर सुस्पष्ट व पूर्ण नमूद करणे बंधनकारक आहे.

६.६ इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरित झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदांकरिता विचार केला जाणार नाही.

६.७ उमेदवाराने अर्जासोबत जोडलेली शैक्षणिक, व्यावसायिक प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच सदर प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या मूळ प्रती त्याचप्रमाणे त्यांच्या साक्षांकित प्रती नियुक्तीपूर्वी तपासणीकरिता सादर करणे आवश्यक आहे.

६.८ उमेदवाराने शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेतील प्रत्येक परीक्षा एकापेक्षा अधिक प्रयत्नात उत्तीर्ण केली असल्यास प्रयत्न प्रमाणपत्र (Attempt Certificate) सादर करणे आवश्यक आहे.

६.९ उमेदवारांनी शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate), शैक्षणिक अर्हतेबाबतची संबंधित गुणपत्रिका व प्रमाणपत्र (गुणपत्रिकेच्या दोन्ही बाजूची छायांकित प्रत सादर करणे बंधनकारक आहे), व्यावसायिक अर्हतेतील गुणपत्रिका व प्रमाणपत्र तसेच अनुभावाचे प्रमाणपत्र त्याचप्रमाणे मागासवर्गीय उमेदवार असल्यास सक्षम अधिका-यांनी दिलेले जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र यांच्या साक्षांकित प्रती वैयक्तिक माहितीपत्रासोबत (BIO-DATA) जोडणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराची निवड झाल्यास, नियुक्तीपूर्वी मूळ प्रती व त्यांच्या सांक्षाकित प्रती पडताळणीकरीता सादर करणे आवश्यक राहील.

६.१० (अ) उमेदवाराने अर्जासह सादर केलेले वैयक्तिक माहितीपत्र (BIODATA) विहित नमुन्यात स्वहस्ताक्षरात, सर्व दृष्टिने पूर्ण असावेत. विहित नमुन्यात नसलेले व अपूर्ण माहिती असलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

६.१० (ब) उमेदवाराने सादर केलेल्या अर्जात दिलेली माहिती/जोडलेल्या साक्षांकित प्रती व मूळ प्रमाणपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास त्याचा/तिचा अर्ज रद्द ठरविण्यात येईल.

६.११ उमेदवाराने त्यांचे अर्ज विहित वेळेत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर व्यक्तिशः/रजिस्टर/स्पीड पोस्टाने पाठवावेत. विलंबाने प्राप्त झालेले / विहित वेळेनंतर सादर केलेले अथवा ऑनलाईन पद्धतीने केलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

६.१२ अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्याच्या स्वाक्षरीसह वैयक्तिक अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. त्याच छायाचित्राच्या चार (४) अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रक्रियेसाठी उमेदवाराजवळ ठेवणे आवश्यक आहे.

६.१३ अर्ज आणि वैयक्तिक माहितीपत्रासाठी (BIODATA) वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतींचे (छायांकित प्रतींसाठी वापरण्यात येणा-या) लीगल आकारातील असावे.

६.१४ जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय, सेवायोजन कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे.

६.१५ विविहित महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबत, विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच राजपत्राची प्रत सादर करावी, ते नसल्यास विवाहित महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.

६.१६ आर्थिक दृष्टया दुर्बल घटकासाठी अर्ज करणा-या उमेदवारांनी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि.३१.०५.२०२१ मधील निदेशानुसार सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त केलेले आर्थिक दृष्टया दुर्बल घटकाच्या पात्रतेचे वैध प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्राची वैधता, अर्ज केल्याच्या दिनांकापासून निवड प्रक्रीया चालू असतानाच्या कालावधीतील असावी.

६.१७ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मागासवर्ग कक्षाचे परिपत्रक क्र. एमबीसी/४२ दि.०१.०६.२०२३ सोबतचा महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.महिआ २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२ दि.०४.०५.२०२३ मधील निर्देशानुसार खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरिता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे. महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे.

६.१८ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या तरतुदी लागू राहतील. मात्र कोणत्याही परिस्थितीत नियुक्तीच्या वेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास उमेदवाराचा नियुक्तीकरिता विचार करण्यात येणार नाही.

६.१९ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील उमेदवाराच्या नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सत्यता पडताळणीबाबत, महाराष्ट्र शासन, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२९७/मावक दि.२६.०४.२०२२ मधील निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल. सदर आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उमेदवाराच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याच्या (नॉन-क्रिमीलेअर) प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी, संबंधित प्राधिकरणाकडून केल्यानंतर त्यांची नियुक्ती करण्यात येईल.

६.२० फोटो असलेले ओळखपत्र उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड आवश्यक आहे.

६.२१ महाराष्ट्र शासन, केंद्र शासन स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांनी पदाचे नाव, जाहिरातीचा संदर्भ व अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेला अंतिम दिनांक इत्यादी तपशीलासह अर्ज, आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना सादर करुन त्यांचे 'ना-हरकत प्रमाणपत्र' कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

६.२२ शासन निदेशानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार वगळता इतर मागासवर्गीय उमेदवारांनी ते/त्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन-क्रिमीलेयर) सक्षम अधिका-यांचे नवीनतम प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत नियुक्तीच्या वेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास उमेदवाराचा नियुक्तीकरिता विचार करण्यात येणार नाही. तथापि, सदर आरक्षणांतर्गत निवड झालेल्या सर्व स्त्री / पुरुष कर्मचा-यांच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याच्या (नॉन-क्रिमीलेयर) प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी संबंधित प्राधिकरणाकडून केल्यानंतर नियुक्ती करण्यात येईल.

६.२३ मागासवर्गीय आरक्षणाअंतर्गत अर्ज करणाऱ्या उमेदवाराने सक्षम अधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र व जात वैद्यता प्रमाणपत्राची साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. मागासवर्गीय उमेदवाराकडे सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास, आरक्षणांतर्गत नियुक्त होणाऱ्या उमेदवारांनी नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, नियुक्तीनंतर एक महिन्याच्या आत संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जातीचा दावा दाखल करून त्याबाबतची पोच पावती नियुक्ती प्राधिका-यांना सादर करणे बंधनकारक राहील.

६.२४ महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३ दि.०६.०४.२०२३ सम क्रमांकाचे शासन पूरक पत्र दि.१०.०५.२०२३ मधील निर्देशानुसार अनाथांची पदे भरण्यात येतील. प्रस्तुत पदासाठी अर्ज करताना अनाथ आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांनी सदर शासन निर्णय व शासन पूरक पत्रात विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार, संस्थात्मक प्रवर्गातील तसेच संस्थाबाहय प्रवर्गातील अनाथांसाठी प्रमाणपत्र निर्गमित करावयाच्या कार्यपद्धतीचा अवलंब करुन, सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही. अनाथ आरक्षणाच्या माध्यमातून अनाथांच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाहीत तरी ती पदे अनाथांच्या दुस-या प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

६.२५ सामाजिक व शैक्षणिक मागास वर्ग अंतर्गत पशुवैद्यकीय अधिकारी पदाकरिता निवड झालेल्या उमेदवारांची महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.७९/आरक्षण-५ दि.१९.०४.२०२४ मधील निर्देशांनुसार प्रलंबित असलेल्या न्यायालयीन याचिकांच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून नियुक्ती करण्यात येईल.

६.२६ उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुद्ध पोलिस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

६.२७ पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी संबधित पोलिस ठाण्याकडून उमेदवाराचे चारित्र्य व पूर्व चारित्र्य प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांविरुद्ध कोणत्याही प्रकारचा गुन्हा नोंदविला नाही अथवा सिद्ध झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबधित पोलिस ठाण्याकडून प्राप्त झाल्यांनतरच त्याची नियुक्ती सदर पदावर केली जाईल.

६.२८ उमेदवाराकडून प्राप्त झालेल्या चारित्र्य व पूर्व चारित्र्य प्रमाणपत्रातील दिनांकापासून ते सदर उमेदवारास सेवेत प्रत्यक्षात नियुक्ती देण्याच्या दिनांकाच्या कालावधीतील उमेदवाराची चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त करण्यात येईल. सदर कालावधीत उमेदवाराविरुद्ध कोणत्याही प्रकारचा गुन्हा आढळून आल्यास सदर उमेदवाराचे नियुक्ती पत्र रद्दबातल करुन भारतीय दंड संहितेनुसार फौजदारी कारवाई तसेच शासन सेवेत कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल.

६.२९ पात्र ठरलेल्या उमेदवारांची एकत्रित सामायिक गुणवत्ता यादी तयार करुन, सदर गुणवत्ता यादीमधील उच्च गुणवत्ताधारक मागासवर्गीय उमेदवारांचा खुला प्रवर्गाच्या पदाकरिता विचार करण्यात येईल.

६.३० निवडीच्या निकषानुसार , गुणवत्ता , सामाजिक व समांतर आरक्षणानुसार अंतिम निवडयादी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. सदर निवडयादी उमेदवाराच्या मूळ शैक्षणिक व इतर अनुषांगिक प्रमाणपत्रांच्या पडताळणीसापेक्ष असेल. उमेदवाराने आवश्यक प्रमाणपत्रे विहित कालावधीत पडताळणीकरिता सादर न केल्यास त्याचे नाव निवड यादीतून रद्द करण्यात येईल.

६.३१ उमेदवाराची मूळ कागदपत्रे पडताळणी करुन ती नियमानुसार यथायोग्य असल्यास नेमणूक करण्यात येईल. तथापि, नेमणूकीच्या कार्यवाही दरम्यान उमेदवार निवडीच्या विहित अर्हता पूर्ण करीत नाही असे निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर किंवा नियुक्तीनंतर निदर्शनास आल्यास त्याची नेमणूक रद्द करण्यात येईल.

६.३२ निवडसूची प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून ०१ वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. तसेच शैक्षणिक, व्यावसायिक व इतर कागदपत्रांच्या पडताळणीसापेक्ष तात्पुरती निवडयादी तयार करुन, पडताळणीअंती अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल. तथापि निवडयादीच्या विधीग्राहयतेच्या कालावधीमध्ये बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील.

६.३३ जाहिरातीत नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येएवढी निवड यादी बनविण्यात येईल. तथापि, निवड यादी कोणत्याही वेळी पूर्व सूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना राहतील. उमेदवाराचे नाव निवडयादीत समाविष्ट झाले असले तरी त्याचा/तिचा नियुक्तीसाठी उमेदवारांना कोणताही अधिकार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

६.३४ प्रस्तृत भरती प्रक्रियेतील रिक्त पदांची उपलब्धता व आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील. सदर नेमणूका उमेदवारांची गुणवत्ता, सामाजिक व समांतर आरक्षण, निवडयादीची विधीग्राहयता, इ. बाबी विचारात घेऊन करण्यात येतील.

६.३५ प्रस्तृत भरती प्रक्रीयेसंदर्भात वेळोवेळी प्रसिद्ध होणारी माहिती व सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वरील संकेतस्थळावर प्रसिद्ध होणार असल्याने भरती प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत सदर संकेतस्थळ उमेदवारांनी वेळोवेळी पहावे. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

६.३६ जर एखाद्या उमेदवाराने नियुक्ती वेळी 'पशुवैद्यकीय अधिकारी'हे पद स्वीकारण्यास कोणत्याही कारणाने नकार दिल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही कारणास्तव सदर पदावर काम करण्यास नकार दिल्यास, त्याची सदर पदावरील निवड रद्दबातल होईल.

६.३७ निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम, १९८९ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम, १९९९ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (शिस्त व अपील) नियम २०१५ लागू होतील तसेच सदरच्या नियमांमध्ये वेळोवेळी झालेल्या / होणाऱ्या सुधारणेनुसार नियम लागू होतील.

६.३८ निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू होईल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजेच मुंबई महानगरपालिका निवृत्तीवेतन नियम १९५३ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

६.३९ प्रस्तृत भरती प्रक्रिये अंतर्गत नियुक्त होणाऱ्या उमेदवारांची नियुक्ती, ही तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल. त्यापुढील सेवासातत्य उमेदवारांच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

६.४० निवड झालेल्या उमेदवाराची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी सदर पदाच्या एक(१) महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम **'सुरक्षा अनामत रक्कम'** म्हणून उमेदवारास भरावी लागेल किंवा तशा आशयाचे क्षतीपूर्ती बंधपत्र सादर करावे लागेल. सदर **'सुरक्षा अनामत रक्कम'** परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्यानंतर, उमेदवारास बिनव्याजी परत मिळेल. उमेदवाराने **'सुरक्षा अनामत रक्कम'** भरल्यानंतर, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील नेमणूक न स्वीकारल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधीत नोकरी सोडल्यास / राजीनामा दिल्यास किंवा काही कारणास्तव सेवा समाप्त /बडतर्फ केल्यास उमेदवाराना **'सुरक्षा अनामत रक्कम'** परत मिळण्याचा हक्क राहणार नाही.

६.४१ निवड होणाऱ्या / झालेल्या उमेदवार कर्मचारी यांना वेळी-अवेळी फिल्डवर जाऊन अत्यावश्यक कामे निकडीप्रमाणे कार्यालयीन वेळेनंतरही करणे बंधनकारक राहील.

६.४२ परिपत्रक क्र.एमबीसी/७१०० दि.३१.०१.२०१२ सोबतच्या शासन निर्णय क्र.बीसीसी/२०११/ प्र.क्र.१०६४/२०११/१६ब दि.१२.१२.२०११ नुसार मागासवर्गीय उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून पडताळणी करुन घेणे बंधनकारक आहे. परंतु जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर उमेदवारास दिलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

६.४३ उमेदवारांना नियुक्तीच्या कार्यवाहीसाठी भरतीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. अर्ज सादर करण्यासाठी उमेदवारास कोणताही भत्ता किंवा खर्च दिला जाणार नाही.

६.४४ उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. सामाजिक व समांतर आरक्षणाअंतर्गत अर्ज करणाऱ्या उमेदवाराने महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. उमेदवाराकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.

६.४५ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, दि.२८.०३.२००५ रोजीची अधिसूचना व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत, शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही २०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दि.०१.०७.२००५ मधील निर्देशांनुसार लहान कुटुंब असल्याबाबत विहित नमुन्यातील प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे. (अविवाहित अर्जदाराने सुद्धा सदरचे प्रतिज्ञापन सादर करणे बंधनकारक असून, त्यामध्ये त्याने/तिने लागू नाही असा शेरा नमूद करावा)

६.४६ निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महानगरपालिकेचे निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

६.४७ प्रस्तृत भरती प्रक्रियेबाबत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील.

६.४८ अराखीव (खुला) पदांकरिता सर्व उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) विचार केला जात असल्याने, सर्व उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित नसले तरी, अर्जामध्ये त्यांचा मूळ जात प्रवर्गाची माहिती अचूकपणे नमूद करणे आवश्यक आहे.

६.४९ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मागासवर्ग कक्षाचे परिपत्रक क्र. एमबीसी/६२५७ दि.२०.०१.२०२० सोबतच्या शासन निर्णयातील निर्देशानुसार अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अथवा वर्ग करण्याची कार्यवाही सुरु असलेल्या कर्मचा-यांचे तसेच मूळ नियुक्ती अ.ज. प्रवर्गातून झालेल्या मागासवर्गीय कर्मचा-यांनी अद्याप अ.ज. प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास आणि अ. ज. प्रवर्गातून नियुक्तीनंतर विशेष मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र सादर केलेल्या कर्मचा-यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

६.५० निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने चुकीची माहिती/ प्रमाणपत्र /कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

६.५१ निवड झालेल्या उमेदवाराला वैद्यकीय तपासणीकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय परीक्षकांकडे पाठविण्यात येईल. तसेच दिव्यांगांकरीता पद आरक्षित नसूनही त्या त्या जात प्रवर्गाअंतर्गत अर्ज करणाऱ्या दिव्यांग उमेदवारांना वैद्यकीय तपासणीकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे पाठविण्यात येईल. वैद्यकीय मंडळाच्या अहवालानुसार उमेदवाराच्या नियुक्तीची कार्यवाही करण्यात येईल.

**विशेष सूचना :**

१. उमेदवाराने अर्जासोबत आवश्यक असलेल्या गुणपत्रिका / प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती जोडण्यात याव्या.

२. यापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे, इत्यादीचा अधिकार दिलेला नाही, याची नोंद घ्यावी.

३. एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्यास अथवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

४. मध्यस्थ/ठक/बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती, यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या सूचना उमेदवारांना देण्यात येत आहेत.

५. सेवायोजन कार्यालय / प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीत देण्यात आलेल्या निर्देशांनुसार अर्ज सादर करावा.

६. प्रस्तृत भरती प्रक्रियेशी संबंधीत सर्व बाबींबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेचा निर्णय हा अंतिम राहील. तसेच तो सर्व उमेदवारांना बंधनकारक राहील. याबाबत केल्या जाणाऱ्या विचारणा व पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

८. निवडप्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती दिली किंवा भरतीप्रक्रियेचे उल्लंघन केल्याची बाब निदर्शनास आल्यास त्याला/तिला निवडप्रक्रियेदरम्यान अपात्र ठरविण्यात येऊन भविष्यात संस्थेच्या (बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या) कोणत्याही भरतीप्रक्रियेस उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही. तसेच सदर बाब भरतीप्रक्रियेनंतर निदर्शनास आल्यास पूर्वलक्षी प्रभावाने उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

९. पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुद्ध पद्धतीने व पारदर्शकतेने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार आहे. त्यामुळे उमेदवारांनी कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये.

**<u>अर्ज करण्याची पध्दत –</u>**

उमेदवाराने संकेतस्थळावरील जाहिरातीचे संपूर्ण अवलोकन करुन, जाहिरातीत नमूद अटी व शर्तीनुसार आपले अर्ज **संचालक (प्राणिसंग्रहालय) यांचे कार्यालय,** वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहाल,दुसरा मजला, पेंग्वीन कक्ष इमारत,संत सावता मार्ग, भायखळा (पूर्व), मुंबई- ४०००२७ येथे कार्यालयीन वेळेत दि.२५.०४.२०२५ पर्यंत आवश्यक ते कागदपत्रांसह सादर करावेत. उमेदवारांनी येथे नमूद केलेल्या पत्त्यावर व्यक्तिश:/रजिस्टर/स्पीड पोस्टाने दिनांक २५.०४.२०२५ पर्यत पाठवावेत. ऑनलाईन अर्ज स्विकारले जाणार नाहीत. (टपालाने अथवा व्यक्तिश: अर्ज सादर करण्याबाबतचा कोणताही खर्च महानगरपालिकेकडून देण्यात येणार नाही.) (वरील दिनांकात बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील) उमेदवारांचे अर्ज कार्यालयात स्वीकारण्याची अंतिम तारीख दि.२५.०४.२०२५ पर्यंत राहील.

**<u>पत्रव्यवहारासाठी कार्यालयाचा पत्ता</u> --**

**संचालक (प्राणिसंग्रहालय) यांचे कार्यालय**
वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालय
दुसरा मजला, पेंग्वीन कक्ष इमारत,
संत सावता मार्ग, भायखळा (पूर्व), मुंबई- ४०००२७.

सही/- ०७.०३.२०२५
**संचालक(प्राणिसंग्रहालय)प्र**

सही/-१९.०३.२०२५
**उपायुक्त(उद्याने)**

सही/- २१.०३.२०२५
**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे)**

सही/-२६.०३.२०२५
**महानगरपालिका आयुक्त**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालय

### पशुवैद्यकीय अधिकारी या पदाकरिता अर्जाचा नमुना (सरळसेवा भरती)

प्रति,
संचालक (प्राणिसंग्रहालय)
वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालय,
दुसरा मजला, पेंग्वीन इमारत, संत सावता मार्ग,
भायखळा (पूर्व), मुंबई – ४०००२७.

अलिकडच्या काळात
काढलेले पारपत्र
आकाराचे छायाचित्र

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालय खात्याच्या आस्थापनेवर पशुवैद्यकीय अधिकारी या पदाकरिता अर्ज**

महोदय,

दिनांक                    रोजीच्या आपल्या कार्यालयाच्या जाहिराती अन्वये मी खालील स्वाक्षरी करणार/ करणारी पशुवैद्यकीय अधिकारी या पदाकरिता विनंती अर्ज करीत आहे. माझी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

१ )पदाचे नाव ---------------------------------------------------

२) अर्जदाराचे संपूर्ण नाव --------------------------------------------------
(आडनाव प्रथम)
(अ) विवाहापूर्वीचे नाव ---------------------------------------------------------------

३) अ) सध्याचा पत्ता ----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------

ब) कायमचा पत्ता- ----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------

क) भ्रमणध्वनी क्र. ------------------------- दूरध्वनी क्रमांक.-------------------------

ड) ईमेल आयडी --------------------------------------------------------

४) लिंग स्त्री / पुरुष / तृतीयपंथी

५) जन्म दिनांक ---------------------------------------------------------------

६) शैक्षणिक अर्हता ---------------------------------------------------------------

| शैक्षणिक अर्हता | परिक्षा मंडळ/ विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | टक्के | एसएससी/एचएससी परिक्षेतील मराठी परिक्षेतील मार्क | | उत्तीर्णाचे प्रमाणपत्र | किती प्रयत्नात उत्तीर्ण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | | प्राप्त गुण | पैकी | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

(★शैक्षणिक अर्हतेबाबत प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात.)

७) अनुभव- (सोबत प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती) ------------------------------------------------

८) उमेदवार मागासवर्गीय आहे का ? (असल्यास तपशील व प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती)-------------

९) उमेदवाराचा जात प्रवर्ग ------------------------------------------

१०) जात वैधता आहे / नाही -------------------------

११) अर्जदारास मराठीचे ज्ञान आहे किंवा कसे-----------------------------------------------

१२) एस.एस.सी. परीक्षेत १०० गुणांचे मराठी - गुण -------------/१०० पैकी

१३) अर्जदारास संगणकाचे ज्ञान आहे किंवा नाही-----------------------------------------------

(असल्यास, तपशील द्यावा आणि उचित प्रमाणपत्र सोबत जोडावे.)

मी शपथपूर्वक या अन्वये असे जाहीर करतो /करते की, मी वर दिलेली सर्व माहिती माझ्या दृष्टीने संपूर्णपणे बरोबर व अचूक आहे, ही माहिती चुकीची/खोटी ठरल्यास किंवा आढळल्यास मी शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र ठरेन व माझा अर्ज रद्द समजण्यात येईल.

सोबत- प्रमाणपत्रांच्या प्रती.

**आपला/आपली विश्वासू**

सही ------------

**(अर्जदाराची स्वाक्षरी)**

**ठिकाण -**
**दिनांक -**